ISSN : 2278-31-80

सामान्यजन संदेश

विशेषांक

५ जाने. २०१९

# भारतीय लोकशाही आणि प्रसारमाध्यमे



लोहिया अध्ययन केंद्र, नागपुर का प्रकाशन

३९. सोशल मीडियाचा वापर व राजकीय सहभागावर परिणाम ..... १२८
डॉ. अजय बोरकर
४०. लोकशाही, निवडणूका आणि प्रसारमाध्यमाची भूमिका ..... १३१
श्री भगवान घोटे
४१. जागतिकीकरणाचा प्रसारमाध्यमांवर प्रभाव आणि त्यांचा समाजजीवनावर परिणाम ..... १३४
डॉ. दिवाकर कामडी
४२. जागतिकीकरणाचा प्रसार माध्यमावर झालेला प्रभाव ..... १४१
प्रा. महेंद्र कुंभारे
४३. सोशल मीडियाचा राजकीय प्रचारावर प्रभाव आणि सोशल मीडियाचे धोके ..... १४५
डॉ. सुधाकर जावळे/डॉ. नरेश जाधव
४४. जनसमुहामध्ये माध्यमाची भूमिका ..... १५१
डॉ. संजय अवधुत
४५. भारतीय लोकशाहीतील निवडणूका, मानवी हक्क आणि प्रसार माध्यमे ..... १५४
डॉ. रतन राठोड
४६. भारतीय लोकशाहीमध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी महिलांचा राजकीय सहभाग व प्रसार माध्यमांची भूमिका ..... १५९
मनोज मेश्राम
४७. स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रसारमाध्यमाचा लोकशाही व्यवस्थेवर झालेला प्रभाव ..... १६५
डॉ. विमल राठोड
४८. भारतीय स्वातंत्र्यलढयात वृत्तपत्रांचे योगदान ..... १६८
प्रा. गुरुदास बल्की
४९. जागतिकीकरणात प्रसारमाध्यमांची भूमिका ..... १७३
डॉ. शरयु पोतनुरवार
५०. भारतीय लोकशाहीत प्रसारमाध्यमांचे योगदान ..... १७६
पांडुरंग सावंत
५१. भारतीय लोकशाहीत प्रसारमाध्यमांचे महत्व ..... १८०
डॉ. राजेंद्र मुद्दमवार/ श्री. बंडु शेरके
५२. भारतीय लोकशाही आणि सोशल मिडीया ..... १८४
डॉ. दत्ता कुंचेलवाड
५३. भारतीय राजकारणातील अमुलाग्र बदलाकरिता प्रसार माध्यमाची भूमिका ..... १८८
प्रा. अंजली वारकड
५४. प्रसारमाध्यमे आणि सामाजिक जागृती ..... १९१
डॉ. माया मसराम
५५. वर्तमानपत्र : कालचे व आजचे ..... १९५
डॉ. सुदर्शन दिवसे

# जागतिकीकरणाचा प्रसारमाध्यमांवर प्रभाव आणि त्यांचा समाजजीवनावर परिणाम

डॉ. दिवाकर कामडी,
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज,
जि. गडचिरोली.

## प्रस्तावना

जागतिकीकरणाची व्याख्या वेगवेगळया विद्वानांनी, अर्थतज्ञांनी वेगवेगळया संदर्भात केलेली आहे. त्यापैकी काही निवडक व्याख्या खाली दिलेल्या आहेत–

- " Globalization means several things for several people."
- " Globalization refers to the process of integration of the world into one huge market."
- " Globalization is usually recognized as being driven by a combination of economic technological, socio cultural, political and biological factors"

वरील व्याख्यांचा विचार केल्यास असे दिसते की, जागतिकीकरण केवळ आर्थिक घडामोडीशी संबंधीत नाही तर संपूर्ण जग एकच विशाल बाजारपेठ गृहित धरून राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, जीवशास्त्रीय, तंत्रज्ञान इ. क्षेत्रात परस्पर वैचारिक देवाणघेवाण असे स्वरूप प्राप्त झाले आहे.

भारताच्या संदर्भातही जागतिकीकरणाचा विचार करणे आवश्यक आहे. १६ वे व १७ वे शतक जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत महत्वाचे सिध्द झाले. हया कालखंडात पोर्तुगीज, स्पॅनिश व नंतर डच आणि ब्रिटिश हयांची सागरी साम्राज्य उदयास येऊ लागली. इ. स. १६०० मध्ये स्थापन झालेल्या ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीचे वर्णन काहीनी 'पहिले बहुराष्ट्रीय निगम' (Multinational Corporation) असे केले. आंतरराष्ट्रीय व्यापारात फार मोठी जोखीम असल्याने तसेच मोठया प्रमाणात गुंतवणुकीची व आर्थिक मदतीची गरज असल्याने ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने भांडवल उभारणी केली. जागतिकीकरणाच्या दृष्टीने पुढे टाकलेले ते एक पाऊल होते. पाहता पाहता १९ व्या शतकात ही कंपनी जागतिक आर्थिक महासत्ता बनली. कारण रेल्वेमार्ग आणि वाफेवर चालणारी जहाजे हयाव्दारे प्रस्थापित केलेले जागतिक दळणवळण आणि उच्च दर्जाचे उत्पादन तंत्र हे होय. त्यामुळे हया शतकात जागतिकीकरणाने आधुनिकतेकडे मार्गक्रमण केले.

जागतिकीकरणाची प्रक्रिया आधुनिक युगात सुरू झालेल्या आर्थिक प्रगतीचा एक अविभाज्य अंग बनले आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावापासून प्रसारमाध्यमेसुध्दा दूर राहीली नाहीत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय माहितीचे प्रसारण, शिक्षण प्रसार व मनोरंजन असे तिहेरी कार्य हे माध्यम करीत होते. या प्रसारमाध्यमांबरोबरच चित्रपट, टी.व्ही, इलेक्ट्रॉनिक, मुद्रीत, इंटरनेट, स्मार्टफोन इ. प्रसारमाध्यमांद्वारे जागतिकीकरणाचा जनजीवनावर प्रभाव झालेला दिसून येतो.

## जागतिकीकरणाचा प्रसारमाध्यमावर प्रभाव

: जगतिकीकरणामुळे भारतातील प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात कोणती स्थित्यंतरे घडली यांचा मागोवा खालीलप्रमाणे दिसून येतो.

### वृत्तपत्रे

स्वातंत्र्य पुर्वकाळात भारतातील प्रसारमाध्यमांनी, विशेषत: वृत्तपत्रांनी स्वातंत्र्यलढा आणि सामाजिक